
Ministry of Education
Government of India
सत्यमेव जयते
Shri. Vatvruksha Swami Maharaj Devasthan's
Kai. Kalyanrao (Balasaheb) Ingale Polytechnic
College, Akkalkot
आज़ादी का
अमृत महोत्सव
CELEBERATING
YEARS OF INDEPENDENCE
75


SHREE. VATVRIKSHA SWAMI MAHARAJ DEVASTHAN's
Founder
Kai.Kalyanrao (Balasaheb) Ingale
Polytechnic Akkalkot
Bramhandnayak
Shri. Mahesh K Ingale
FACILITATION CENTRE
अधिकृत सुविधा केंद्र
(D-6474)

# कै. कल्याणराव इंगळे अभियांत्रिकी महाविद्यालयात झाले राष्ट्रध्वजाचे वाटप

## स्वातंत्र्य दिन अमृत महोत्सवात कै. इंगळे महाविद्यालया चा उत्स्फूर्त सहभाग

**सोलापूर भूषण**

अक्कलकोट, (प्रतिनिधी) : येत्या १५ ऑगस्ट रोजी भारत स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव दिन आहे. यानिमित्त आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा उपक्रम संपूर्ण देशभर राबविण्याचे आवाहन राज्य व केंद्र शासनाने देशातील जनतेला केले आहे. हा उपक्रम स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिनांक ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट अखेर राबविण्यात येणार आहे. यामध्ये तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन कडून राज्यातील तंत्रनिकेतन



महाविद्यालयांनाही स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा दोन्ही उपक्रम राबविण्याकामी निर्देशित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे व महाविद्यालयाचे विविध शासकीय शैक्षणिक उपक्रमांना मंदिर समितीचे व महाविद्यालयाचे नेहमीच सहकार्य असते असेही स्पष्टीकरण महेश इंगळे यांनी याप्रसंगी केले.

या पार्श्वभुमीवर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या कै कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा उपक्रम राबविणेकामी आज महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जवळपास ५० राष्ट्रध्वजांचे (तिरंग्याचे) वितरण करण्यात आले. या अमृत महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांकरिता देशभक्तीपर सांस्कृतिक विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे यांनी दिली. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे, उपप्राचार्य विजय पवार, उमेश सोनवणे, रवींद्र नष्टे, चितरंजन अगरथडे, आदींसह महाविद्यालयाचे अन्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कै.कल्याणराव इंगळे महाविद्यालयात राष्ट्रध्वजाचे वाटप

## शासकीय आव्हानास स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा उपक्रमांना उत्साहाने प्रतिसाद




अक्कलकोट (प्रतिनिधी): येत्या १५ ऑगस्ट रोजी भारत स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव दिन आहे. यानिमित्त आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा उपक्रम संपूर्ण देशभर राबविण्याचे आवाहन राज्य व केंद्र शासनाने देशातील जनतेला केले आहे. हा उपक्रम स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिनांक ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट अखेर राबविण्यात येणार आहे. यामध्ये तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन कडून राज्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयांनाही स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा दोन्ही उपक्रम राबविण्याकामी निर्देशित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे व महाविद्यालयाचे विविध शासकीय शैक्षणिक उपक्रमांना मंदिर समितीचे व महाविद्यालयाचे नेहमीच सहकार्य असते असेही स्पष्टीकरण महेश इंगळे यांनी याप्रसंगी केले.

या पार्श्वभुमीवर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या कै कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा उपक्रम राबविणेकामी आज महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जवळपास ५० राष्ट्रध्वजांचे (तिरंग्याचे) वितरण करण्यात आले. या अमृत महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांकरिता देशभक्तीपर सांस्कृतिक विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे यांनी दिली. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे, उपप्राचार्य विजय पवार, उमेश सोनवणे, रवींद्र नष्टे, चित्तरंजन अगरथडे, आदींसह महाविद्यालयाचे अन्य शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.